**नियमित दिवाणी दावा ५८/२०२५**
**सुभाष श्रीपती कांबळे**
**वि.**
**दगडु दामाजी कांबळे वगैरे ३**

# नि.IA/४/२०२६ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादी समाविष्ट करणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिदाव्यातील वादी क्र. १ ते ४ यांनी नि. ४० येथे त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिदाव्यातील वादी क्र.१ तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, मुळातच दावा वादी यांनी कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी यांनी दावा मिळकत प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच सदर दाव्यामध्ये वादी यांनी काही क्षेत्र बापू नारायण इरळेकर यांचेकडून खरेदी घेतले आहे. प्रतिवादी यांनी वादीचे दाव्यास कैफियत, म्हणणे व प्रतिदावा दाखल केलेला आहे. वादी किंवा बापू नारायण इरळेकर हे प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंबातील सदस्य नसून ते तिऱ्हाईत इसम आहेत. त्यामुळे त्यांना कायद्यातील तरतुदीनुसार प्रतिवादींचे वाडवडिलार्जित मिळकतीमध्ये कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय मालकी अगर कब्जा प्राप्त होत नाही. तसेच त्या अनुषंगाने प्रतिवादी यांनी कैफियत व प्रतिदावेमध्ये दुरुस्ती अर्ज दाखल करून त्याप्रमाणे दुरुस्ती केलेली आहे. त्यामुळे तथाकथित खरेदीपत्र क्र. ११२७ दि. ०३.०८.१९९४ बाबत बापू नारायण

इरळेकर व त्यांचे वारस यांना प्रतिदाव्याचे कामी प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्यामध्ये सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे जादा प्रतिदावा समाविष्ट करणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी व संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच प्रतिदाव्यामध्ये समाविष्ट प्रतिवादी सुभाष श्रीपती कांबळे यांचे नंतर प्रतिवादी २ अ ते २ड म्हणून सदर अर्जात नमूद केलेले प्रतिवादी समाविष्ट करण्यास परवानगी मिळणे आवश्यक आहे. तसेच प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादी समाविष्ट केल्यास प्रतिदाव्याच्या वर्णनामध्ये कोणताही बदल होत नाही किंवा नवीन केस निर्माण होत नाही. तसेच ज्यादा प्रतिवादी यांनी अर्ज देवून प्रतिदाव्यामध्ये कलम ७अ समाविष्ट केलेला आहे. तसेच प्रतिवादी समाविष्ट केल्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. परंतु प्रतिदाव्यामध्ये प्रतिवादी समाविष्ट न केल्यास वादीचे अतोनात असे नुकसान होणार असून त्यांना न्यायदानास मुकावे लागणार आहे. प्रतिदाव्यातील वादी तर्फे वकील यांनी **लुयिस फ्रान्सीको ग्रेशिअस वि. मोहन स्टॅम्प मेन नं. १६६७/२०२०** या न्यायनिर्णयावर त्यांची भिस्त ठेवली. अंतिमतः प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिदाव्यातील वादी नं. १ यांनी दिलेला सदरचा अर्ज कायद्यातील तरतुदीप्रमाणे चालणेसच पात्र नाही. तसेच कायद्यातील तरतुदीप्रमाणे सन १९९४ मधील खरेदीपत्राबाबत बत्तीस वर्षानंतर वाद उपस्थित करण्याचा अधिकारच येत नाही. ज्यांच्यामध्ये खरेदीपत्र झालेले आहे ते म्हणजेच खरेदी देणार व खरेदी घेणार हे मयत आहेत. त्यामुळे त्यांचे वारसांना बत्तीस वर्षांनी विचारणा करता येणार नाही. तसेच दावा दाखल करणे अगर दावा मिळकतीशी प्रतिदाव्यातील वादीचा अगर त्यांचे पूर्वहक्कदाराचा तसेच बापू नारायण इरळेकर अगर

त्यांचे वारसांचा कसलाही मालकीचा कब्जेवहिवाटीचा अगर अन्य कसल्याही स्वरूपाचा हक्क संबंध नव्हता व नाही. तसेच केवळ प्रतिदाव्यातील वादीच्या काल्पनिक कथनाच्या आधारे प्रतिदाव्यातील वादीचे प्रतिदाव्यामध्ये प्रतिदाव्यातील वादी नं. २अ ते २ ड म्हणून कलम तीन मध्ये प्रतिदाव्यातील वादी म्हणून समाविष्ट करता येणार नाही. तसेच बापू नारायण इरळेकर यांचे वारसांबाबतची सर्व माहिती म्हणजेच नावे, वय, पत्ते चुकीचे नमूद केलेले आहेत. केवळ दाव्याची चौकशी लांबविण्याच्या उद्देशाने तसेच वादी व प्रतिदाव्यातील वादी यांचे मध्ये वाद वाढविण्याच्या उद्देशाने प्रतिदाव्यातील वादी नं. १ यांचा सदर अर्ज नामंजूर होणे आवश्यक आहे. तसेच प्रतिदाव्यातील वादी समाविष्ट केल्याने दाव्याचे कामी गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे सदर अर्जाचा खर्च म्हणून प्रतिदाव्यातील वादी नं. १ यांना जास्तीस जास्त कॉस्टस करणेत यावी. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. प्रतिदाव्यातील वादी क्र. १ यांचा अर्ज, मूळ दाव्यातील वादी यांचे म्हणणे तसेच कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. प्रतिदाव्यातील वादी तर्फे वकील यांनी दाखल केलेल्या **लुयिस फ्रान्सीको ग्रेशिअस वि. मोहन स्टॅम्प मेन नं. १६६७/२०२०** या न्यायनिर्णयामध्ये मूळ याचिकाकर्ता यांनी खरेदीपत्र व चुक दुरुस्ती लेख हा चुकीचा व अवैध आहे या कारणाकरिता हक्कज्ञापन मागितले होते. या न्यायनिर्णयात मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी *"दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) नुसार न्यायालय कोणता पक्षकार हा दाव्याचा न्यायनिर्णय होणेकरिता गरजेचा आहे या अनुषंगाने निर्णय घेवू शकते. तसेच न्यायालय प्रकरणाच्या कोणत्याही वेळी संबंधित पक्षकार यांनी अर्ज दिल्यास किंवा स्वतः दाव्यात पक्षकारांना सामील करून घेवू शकते. "* असे सारसुत्र दिलेले आहे.

सदर न्यायनिर्णयातील सारसुत्र येथे लागू होईल असे नम्रतापूर्वक वाटते.

७. मुळातच वादी यांच्या दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांनी सदरचा दावा हा कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्याच्या अनुषंगाने प्रतिवादी यांनी प्रतिदावा हा खरेदीपत्रके रद्द होण्याबाबतचे हक्कज्ञापन होण्याबाबतचा, गहाणखत मुकत होणेकरिता व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. मुळातच सदर दावा व प्रतिदावा यांच्या अनुषंगाने खरेदीपत्र अनुषंगाने अतिरिक्त प्रतिवादींना प्रतिदाव्यात समाविष्ट करणे प्रतिदाव्याच्या न्यायनिर्णय अनुषंगाने योग्य होईल असे वाटते. त्यामुळे प्रतिदाव्यातील वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. मात्र सदर कामी झालेला विलंब हा कोणत्याही प्रकारे दुर्लक्षित करता येणारा नाही असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१. प्रतिदाव्यातील वादी यांचा नि. IA/४/२०२६ वरील अर्ज रक्कम रु. ५००/- प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला आहे.**

**२. सदर कामी प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी दुरुस्ती करून नवीन प्रतिवादी यांना प्रतिदाव्यात समाविष्ट करण्याची दुरुस्ती ही १४ दिवसात करून सदर दुरुस्ती प्रत तात्काळ दाव्यात दाखल करावी असा आदेश देण्यात येत आहे.**

सही/-
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि. ०७.०५.२०२६